**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(असाधारण)**
**अधिसूचना**

क्र. - १७६/२०२२ दिनांक - २.११.२०२२

**विषय - अधिसभा निवडणूक २०२२ ........अतिरिक्त मतदान केंद्र निर्मितीबाबत.**
संदर्भ - अधिसूचना क्र. १५६/२०२२, दि. ६.१०.२०२२

सर्व संबंधितांच्या माहितीकरीता अधिसूचीत करण्यात येते की, संदर्भांकित अधिसूचनेच्या माध्यमातून अधिसभा निवडणूक २०२२ घेण्यासाठी एकूण ६३ मतदान केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. अमरावती शहराकरीता श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती (१०८) हे मतदान केंद्र म्हणून निश्चित आहे. सदर मतदान केंद्रावरील मतदारांची संख्या लक्षात घेता या मतदान केंद्राला अजून एक उप मतदान केंद्राची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे. करीता याच महाविद्यालयाच्या परिसराला लागून असलेले श्री शिवाजी शारिरीक शिक्षण महाविद्यालय, अमरावती (८४१) हे महाविद्यालय उप मतदान केंद्र म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सर्व संबंधितांच्या माहितीकरीता याद्वारे असेही अधिसूचीत करण्यात येते वरील दोनही मतदान केंद्रावर खालील प्रमाणे मतदान व्यवस्था राहील याची अमरावती शहरातील सर्व मतदारांनी नोंद घ्यावी.

**१०८ - श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती मतदान केंद्राकरीता -**
या मतदान केंद्रावर फक्त संलग्नित महाविद्यालयांचे शिक्षक, विद्यापीठ शिक्षक, प्राचार्य, संस्थाचालक प्रतिनिधी, अभ्यास मंडळावरील विभाग प्रमुख यांचेकरीता मतदानाची व्यवस्था राहील. तसेच याच मतदान केंद्रावर सदहू उल्लेखित मतदार जर पंजीकृत पदवीधर म्हणूनही मतदार असतील तर त्यांचेसाठी याच ठिकाणी मतदानाची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**८४१ - श्री शिवाजी शारिरीक शिक्षण महाविद्यालय, अमरावती मतदान केंद्राकरीता -**
या मतदान केंद्रावर जे फक्त आणि फक्त पंजीकृत पदवीधर मतदार म्हणून मतदानाचा हक्क बजावणार आहेत त्यांचेसाठी मतदानाची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे.

स्वा./-
कुलसचिव तथा निवडणूक निर्वाचन अधिकारी
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ